डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

संदर्भ : रासेयो/२०१९–२०/३७४ दि. २४/१०/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य व,
रासेयो कार्यक्रम अधिकारी,
रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,
फक्त पुणे शहर.

विषय : स्वच्छ पुणे–सिंगल यूज प्लॅस्टिक बंदी उपक्रम राबवणेबाबत

महोदय,

स्वच्छ सर्वेक्षण कार्यपद्धतीमध्ये लोकशिक्षण व जनजागृती, प्रक्रिया व विल्हेवाट यासाठी अधिक प्राधान्य असून नाविन्यपूर्ण आणि उत्कृष्ट कार्य हा घटक नव्याने समाविष्ट करण्यात आलेला आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०१९ या स्पर्धेमध्ये पुणे शहराचे मानाकंन उंचावून मोठया प्रमाणावर शहरातील नागरिकांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. यासाठी पुणे शहरातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांच्या माध्यमातून जनप्रबोधनाकरिता आपल्या महाविद्यालयामध्ये खालील उपक्रमांचे आयोजन करावे.

१. विद्यार्थ्यांकरिता स्वच्छता प्रश्नावली मंजुषेचे आयोजन करावे.

२. स्वच्छ सर्वेक्षण या अनुषंगाने महाविद्यालयांच्या भिंती रंगविणे, स्टीकर चिटकवणे.

३. महाविद्यालयांमध्ये निंबध, वक्तृत्त्व, पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात.

४. प्रत्येक सोमवारी महाविद्यालयांमध्ये स्वच्छता विषयक प्रतिज्ञा देण्यात यावी.

५. स्वच्छता ॲप डाऊनलोड करण्यासाठी विद्यार्थी व पालकांचा सहभाग वाढविणे.

सदर उपक्रम संपन्न झाल्यानंतर स्वच्छता विषयक प्रतिज्ञा व उपक्रमाचे फोटो व अहवाल त्वरीत swmadmin@punecorporation.org या मेलवर “स्वच्छ सर्वेक्षण” या विषयासह पाठवण्यात यावा. कळावे, ही विंनती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत– सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे पत्र

घनकचरा व्यवस्थापन कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.घ.क.व्य.का/ घकव्यका /३९२७
दि. १७/१०/२०१९

मा.संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सावित्रीबाई फुले विद्यापीठ,
पुणे-४११ ००७.

आवक क्र. ६४६
दिनांक २२ OCT 2019
राष्ट्रीय सेवा योजना शाखा-

यांजकडेस सविनय सादर.. .. ..

**विषय:-** सावित्रीबाई फुले विद्यापीठ, अंतर्गत सर्व कॉलेजमध्ये स्वच्छ पुणे-सिंगल यूज प्लॅस्टिक बंदी संदर्भात प्रतिज्ञा घेणेबाबत.

**संदर्भ:-** स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०१९-२०.

मा. महोदय,

स्वच्छ सर्वेक्षण कार्यपद्धतीमध्ये लोकशिक्षण (IEC) व जनजागृती, प्रक्रिया व विल्हेवाट यासाठी अधिक प्राधान्य असून नाविन्यपूर्ण आणि उत्कृष्ट कार्य हा घटक नव्याने समाविष्ट करण्यात आलेला आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०१९ या स्पर्धेमध्ये पुणे शहराचे मानांकन उंचावून पुणे शहराला सदर स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शहरातील नागरिकांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. यासाठी पुणे शहरातील सर्व शाळांमधील विध्यार्थी व शिक्षक यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जनप्रबोधन होणेकरीता सर्व शाळामध्यें पुढील माध्यमातून उपक्रम राबविणे आवश्यक आहे:-

(१) विध्यार्थ्यांसाठी स्वच्छता प्रश्नावली मंजुषा.
(२) स्वच्छ सर्वेक्षण अनुषंगाने शाळांच्या भिंती रंगविणे.
(३) शाळांमध्ये स्वच्छ सर्वेक्षणचे स्टीकर चिटविणे.
(४) शाळांमधील विध्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच वक्तृत्व स्पर्धा या उपक्रमांचे आयोजन करणे.
(५) स्वच्छ शाळा उपक्रम राबवून शाळेमधील स्वच्छतास्तर उंचावणे.
(६) प्रत्येक सोमवारी शाळेमध्ये स्वच्छता विषयक प्रतिज्ञा घेणे.
(७) स्वच्छता अॅप डाउनलोड करण्यासाठी विध्यार्थी व पालकांचा सहभाग वाढविणे.

तसेच मे. केंद्रशासन व मे. राज्य शासनाकडील पर्यावरण विभागाकडून सिंगल यूज प्लॅस्टिक बंदी संदर्भात अध्यादेश जारी करण्यात आलेला आहे. सदर सिंगल यूज प्लॅस्टिक बंदी संदर्भात मोठ्या प्रमाणावर जनप्रबोधन करण्यासाठी विविध ठिकाणी प्रतिज्ञा घेण्याचे आयोजन करण्यात आलेले आहेत. सावित्रीबाई फुले विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये सदर सिंगल यूज प्लॅस्टिक बंदी संदर्भात प्रतिज्ञा घेण्यात आल्यास यामाध्यमातून मोठ्या प्रमाणावर जनप्रबोधन होणार आहे. सोबत प्रतिज्ञापत्राचे नमुनापत्र जोडण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त विषयाचे अवलोकन होऊन सावित्रीबाई फुले विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये सदर सिंगल यूज प्लॅस्टिक बंदी संदर्भात प्रतिज्ञा घेण्यात यावी व त्याचे छायाचित्रे (फोटो) तसेच महाविद्यालय निहाय उपस्थिती यांची माहिती भ्रमणध्वनी (मोबाईल) क्र. ७७७५००३७०८ या क्रमांकावर अथवा कार्यालयीन मेल आय डी- swmadmin@punecorporation.org या मेल वर पुणे महानगरपालिकेकडे सत्वर सादर करण्यात यावी ही नम्र विनंती आहे.

मा.स.कळावे.

17-10-19

(ज्ञानेश्वर मोळक)
सह महापालिका आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

माहितीसाठी प्रत:-

**मा.कुलगुरू, सावित्रीबाई फुले विद्यापीठ,**
**पुणे-४११ ००७.**

## स्वच्छ पुणे प्रतिज्ञा

- मी अशी प्रतिज्ञा करतो की, पुणे शहराला स्वच्छ ठेवण्यासाठी प्रामाणिकपणे वेळ देईल.
- मी पुण्याचा नागरीक म्हणून पुण्याला स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक बनविण्यासाठी कटीबद्ध राहील.
- मी प्लॅस्टिक व थर्माकोल वापरणार नाही व इतरांनाही वापरू देणार नाही.
- या पुढे मी कापडी किंवा कागदी पिशव्यांचाच वापर करीन. पुण्याला प्लॅस्टिक कचरामुक्त शहर बनविण्यास सहकार्य करीन.
- मी आजपासून सिंगल यूज प्लॅस्टिकचा वापर पूर्णपणे टाळेल व इतरांनाही सिंगल यूज प्लॅस्टिक वापरण्यापासून परावृत्त करेल.

"स्वच्छता ही सेवा" या मोहिमेंतर्गत सिंगल
युज प्लास्टिक (Single Use Plastic)
बंदीची मोहिम प्रभावीपणे राबविणेबाबत.

विभागीय आयुक्त कार्यालय,
नगरपालिका प्रशासन शाखा
(विधानभवन)पुणे विभाग, पुणे.
परिपत्रक क्रमांक :-न.पा./६/स्वमअ/ २२८ /२०१९
दि. ३० सप्टेंबर २०१९

वाचा -

१) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्रमांक स्वभाअ २०१९/प्र.क्र. ११९/ नवि ३४, दि. २७/०९/२०१९
२) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्रमांक स्वभाअ २०१९/प्र.क्र. १२०/ नवि ३४, दि. २७/०९/२०१९

परिपत्रक

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये संदर्भ क्रमांक १ मधील शासन परिपत्रकान्वये दि. ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती असून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारताची संकल्पना साकारण्यासाठी दि. ०२ ऑक्टोबर २०१९ पासुन संपुर्ण देशात सिंगल युज प्लास्टिक (Single Use Plastic) चा वापर बंद करण्याची घोषणा करण्यात आली आहे.तसेच महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग दि. ३०/०६/२०१८ च्या अधिसुचनेनुसार राज्यात प्लास्टिक बंदी लागु करण्यात आली आहे.

"स्वच्छता ही सेवा" या मोहिमेअंतर्गत सिंगल युज प्लास्टिक बंदी मोहिम ३ टप्प्यामध्ये राबविण्याचे संदर्भीय परिपत्रकानुसार नियोजित आहे. यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी -

| | | |
|---|---|---|
| टप्पा १ | दि. ११/०९/२०१९ ते ०१/१०/२०१९ | तयारी आणि जागरुकता |
| टप्पा २ | दि. ०२/१०/२०१९ | श्रमदान चळवळीअंतर्गत शहरातील सर्व नागरिकांकडे असलेले प्लास्टिक त्यांच्याकडून गोळा करणे व प्लास्टिकचा वापर न करणेबाबत प्रतिज्ञा घेणे. |
| टप्पा ३ | दि. ०३/१०/२०१९ ते २७/१०/२०१९ | गोळा केलेल्या प्लास्टिकचे पुनर्चक्रीकरण (रिसायकल) / विल्हेवाट लावणे व प्लास्टिकमुक्त दिवाळीकडे वाटचाल करणे. |

तसेच वरीलप्रमाणे कार्यवाही करणेसाठी -

> मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी

यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी

सविनय सादर...

Scanned with CamScanner

- नागरीक सहभाग जास्तीत जास्त करून घ्यावा
- श्रमदान चळवळ राबवावी
- प्लास्टिक संकलन केंद्र स्थापन करावे
- नागरिकांकडून प्लास्टिक स्विकारून त्यांना कापडी पिशव्या देण्यात याव्यात.
- वरील कृतीचे फोटो, व्हिडीओ घेण्यात यावेत.
- सर्व इव्हेंट व कृती स्वच्छ मंच पोर्टलवर अपलोड करावेत.
- संकलित प्लास्टिकची पुनर्चक्रीकरण (रिसायकल) / विल्हेवाट योग्य प्रकारे करावी

तसेच वरील मोहिम राबविताना सद्यस्थितीत लागू आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्लास्टिकमुक्त निवडणुकीच्या सुचनांबाबत कार्यवाही करावी.

नगरपालिका क्षेत्रामधील सर्व शासकीय कार्यालयामध्ये **'प्लास्टिक निषिद्ध क्षेत्र'** म्हणून बोर्ड लावावेत. तसेच कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारचे सिंगल युज प्लास्टिक वापरले जाणार नाही याबाबत सर्वांना अवगत करावे.

वरीलप्रमाणे "स्वच्छता ही सेवा" या मोहिमेअंतर्गत सिंगल युज प्लास्टिक बंदी मोहिम राबविणेबाबतचा अहवाल दर ८ दिवसाला न चुकता सादर करावा.

(डॉ. दिपक म्हैसेकर)
विभागीय आयुक्त, पुणे

प्रति :

१) जिल्हाधिकारी पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर
२) आयुक्त महानगरपालिका (पुणे विभागातील सर्व)
३) उपायुक्त सामान्य प्रशासन शाखा विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
४) जिल्हा प्रशासन अधिकारी पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर
५) मुख्याधिकारी (पुणे विभागातील सर्व)

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्र. ९111 दि. 5 OCT 201
जावक क्र. 9419 दि. 5/10/19